# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 09 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०९ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दर साडे सहा टक्के इतका कायम ठेवला आहे. नवी दिल्लीत बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातल्या सात हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पायाभरणी होणार आहे. यामध्ये नागपूर आणि शिर्डी विमानतळ इथल्या कामांचं भूमीपूजन आणि राज्यातल्या नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन होणार आहे. मुंबई, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ याठिकाणी ही वैद्यकीय महाविद्यालयं सुरु होणार आहेत. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० नी वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष चार हजार ८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार आहेत. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्रात विद्या समीक्षा केंद्राचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाल्याचं, रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं. जॉन हॉपफिल्ड यांनी प्रतिमा आणि इतर विदा प्रणाली साठवून ठेवण्याकरता संलग्न मेमरीची निर्मिती केली आहे. उपलब्ध माहितीतून वैशिष्ट्यं ओळखून काढून प्रतिमांमधून ते शोधण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची पद्धत जेफ्री हिंटन यांनी तयार केली आहे.

****

अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन इमारत बांधणीचं भूमिपूजन काल राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आणि उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झालं.

****

राज्यातल्या शाळांमध्ये चार हजार ८६० विशेष शिक्षकांची पदं निर्माण करण्यास राज्य सरकारनं काल मंजुरी दिली. त्यातल्या २ हजार ९८४ पदांवर सध्या कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या शिक्षकांचं समायोजन केलं जाणार आहे. त्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रतेनुसार समकक्ष वेतनश्रेणी लागू असेल.

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचं आज सकाळी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झालं. विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, आदींनी त्यांचं स्वागत केलं. इथून राज्यपाल बीड तसंच जालना जिल्हा दौऱ्यावर जाणार असून, विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधणार आहेत.

****

लातूर जिल्ह्यात विविध वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या आरोग्य विषयक तसंच इतर बाबतीत काही गैर घडल्यास संबंधित वसतीगृहाचे अधीक्षक, प्राचार्य तसंच संस्था चालकांवरही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिला आहे. लातूर शहरातल्या पूरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन तसंच नवोदय विद्यालयात जेवणातून झालेल्या विषबाधेच्या नुकत्याच घडलेल्या घटनेनंतर जिल्हाधिकारी ठाकूर यांनी काल सर्व संबंधित प्राचार्य, संस्थाचालक यांची बैठक घेतली, त्या बैठकीत त्यांनी हा इशारा देत, संबंधितांना खबरदारीच्या सूचना दिल्या.

****

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष सुभाष राऊत यांनी काल परभणी जिल्ह्यातल्या पुरवठा विभागाच्या शासकीय धान्य गोदामे, स्वस्त धान्य दुकाने आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. संबंधित विभाग प्रमुखांनी शासकीय धान्य गोदामे, स्वस्त धान्य दुकाने, शाळा, अंगणवाडी इथं भेटी देऊन धान्य वाटपाचा प्रत्यक्ष आढावा घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

भीमा उजनी प्रकल्पाअंतर्गत देगाव शाखा कालव्याच्या कामांचं भूमिपूजन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. या कामासाठी ३५२ कोटी रुपये खर्च येणार असून, याचा लाभ दक्षिण सोलापूर तालुक्यातल्या दहा गावे आणि अक्कलकोट तालुक्यातल्या २५ गावांना होणार असून, यामुळे १६ हजार १२९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

****

बीड जिल्ह्यात कडा शहरात काल निवडणूक आयोगाच्या स्विफ्ट उपक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. कडा शहरातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेतून आणि मोतीलाल कोठारी विद्यालयातून विद्यार्थ्यांनी पायी आणि सायकल रॅली काढून गावात जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी मतदान जागृती करणारे फलक हातात घेऊन ग्रामपंचायत कार्यालयासह, सार्वजनिक ठिकाणी जाऊन जनजागृती केली.

****

नागपूर इथं पवित्र दीक्षाभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने ६८ व्या धम्मप्रवर्तन दिन कार्यक्रमाला उद्यापासून प्रारंभ होत आहे. १२ ऑक्टोबरपर्यंत हा सोहळा चालेल. उद्या सकाळी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत भिक्खू संघ, उपासक तसंच श्रामणेर यांना दीक्षा देतील. धम्मदीक्षेचा हा कार्यक्रम सलग तीन दिवस चालणार आहे.

****